# प्रकरण पाचवे

## श्री गणपती पंचायतन मंदिर

# गणेशोत्सव परंपरा

# प्रकरण पाचवे

# श्री गणपती पंचायतन मंदिर गणेशोत्सव परंपरा

**प्रस्तावना :**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात गणेश पूजनाला असीम महत्त्व आहे. लोकमान्य टिळकांनी गणेश पूजनाच्या माध्यमातून जनजागृती व लोकसंघटन निर्माण करावयाचा अभिनव प्रयत्न केला होता. मुख्यत: महाराष्ट्राबाहेर संपूर्ण राष्ट्रांमध्ये इतरत्र गणेशोत्सवाची लोकप्रियता आणि व्याप्ती झपाट्याने वाढीस लागली आहे. सांगली शहरातील गणेशोत्सवाच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रस्तुत प्रकरणात सांगली शहरातील गणेशोत्सवाचे बदलते स्वरुप व श्री गणपती पंचायतन मंदिराची गणेशोत्सव परंपरा याचा आढावा घेतला आहे.

**गणेशोत्सवाची प्राचीनता :** इतिहासाचार्य वि. का. राजवाडे (१८६३-१९२६) यांनी गणेशाचे अस्तित्व अडीच हजार वर्षापासून सिध्द केले आहेच. परंतु गणेशोत्सवसुध्दा प्राचीन कालापासून रुढ होता. यासंबंधी त्यांनी इ. स. १९१० साली गणेशोत्सवावर दिलेल्या जाहीर व्याख्यानात म्हंटले होते, " हा गणपतीचा उत्सव जुन्या, पुरातन काळापासून प्रचलित आहे. सातवाहन, राष्ट्रकूट आणि चालुक्य वगैरे राजघराण्यांच्या काळी तो चालू होता. हे उत्सव वैयक्तिक असूनही पूर्वीपासून त्याला सार्वजनिक स्वरुप होते." गणेशोत्सवाला सार्वजनिक सुसंघटित उत्सवाचे स्वरुप सर्वप्रथम लोकमान्य टिळकांनी (१८५६-१९२०) इंग्रज राजवटीत इ.स. १८९४ मध्ये दिले असले तरी तत्पूर्वी पेशवेकाळात (१७१३-१८१८) जो गणेशोत्सव साजरा व्हायचा, त्याचेही स्वरुप बरेचसे सार्वजनिक होते.[१]

पेशवे घराणे गणपतीचे निस्सीम उपासक होते. नानासाहेब पेशव्यांनी (१७४०-६१) सन १७५५ मध्ये पुण्यातील शनिवार वाड्यात गणपती महाल बांधून गणेशोत्सवास प्रारंभ केल्याचे उल्लेख आढळतात.[२] थोरले माधवराव पेशवे (१७६१-७२) यांच्या काळात सन

१७६७ मध्ये गणेशोत्सवा दरम्यान जो खर्च आला होता त्यांचे संदर्भ पेशवे दप्तरात पहावयास मिळतात. यामध्ये २६८२ रुपयांचा खर्च हरिदास, गवई व कलावंतिणी यांना दिलेल्या बिदागीचा आहे तर १९५ रुपयांचा खर्च दिवाणखान्यात लावण्यासाठी जी चित्रे खरेदी केली होती त्या संदर्भातील आहे.[३] पुढील काळात सवाई माधवराव पेशव्यांच्या (१७७४-९५) कारकिर्दीत गणेशोत्सव धूमधडाक्यात साजरा झाल्याचे उल्लेख 'सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार' या पुस्तकात आले आहेत. त्यामध्ये सन १७९५ रोजीच्या उत्सवांतर्गत कार्यक्रमामध्ये हरिदासांखेरीज ३९ गवई, ४३ कलावंतिणी, ३३ गुरवपखवाजी, २५ वाजंत्री, १९ कर्णेकरी हे कलावंत आपली कला उत्सवात सादर करण्यासाठी आले होते. या कलावंतांना ३९९४ रुपये बिदागी आणि वस्त्रे व मिठाई देण्यात आली होती. त्याचबरोबर उत्सवकाळात दररोज ५०० ब्राह्मणांना भोजन व गरीब लोकांना शिधा वाटली होती.[४] पेशव्यांप्रमाणेच त्यांचे सरदार असलेले दीक्षित, विंचुरकर, पटवर्धन व मुजुमदार यांच्या घराण्यांमध्येही गणपती पूजनाची व गणेशोत्सवाची प्रथा पूर्वपरंपरेने सुरु होती. सांगलीचे पटवर्धन घराणे हे त्यापैकी एक होते.[५]

सांगलीचे संस्थानाधिपती श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांनी सांगलीतील गणेशदुर्ग किल्ल्यातील राजवाडा सभागृहात सन १८०९ पासूनच गणेशोत्सवास प्रारंभ केला होता. संस्थानिक गणेशोत्सवाच्या खास वैशिष्ट्यांमुळे जनमाणसात हा उत्सव म्हणजे एक अपार श्रध्देचा विषय होता व आजही आहे.[६]

**संस्थानिक गणेशोत्सव :** पटवर्धन संस्थानाधिपतींच्या गणेशोत्सवास जवळ जवळ दोनशे वर्षाचा कालावधी लोटला असला तरी उत्सवाची एक वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. या उत्सवात प्रतिष्ठापित करावयाची गणपतीची मूर्ती पारंपारिक व धार्मिक कल्पनेनुसार म्हणजेच एकदंत, चर्तुभूज, पांशाकुशधारी, मंगल-प्रसन्न अशी दीड फूट उंचीची व शाडूच्या मातीपासून तयार करुन घेतलेली असते. उत्सव मूर्तीचे विडंबन होईल असा कोणताही बदल दोनशे वर्षाच्या काळात सांगली संस्थानाधिपतींनी केला नाही.[७] संस्थानाधिपतींचा मुख्य गणेशोत्सव राजवाडा सभागृहात चतुर्थी ते अष्टमी असा साजरा केला जातो. प्रतिष्ठापित करावयाची

उत्सवमूर्ती प्रथम गणपती पंचायतन मंदिरात नेऊन तेथे आरती केली जाते. प्रतिष्ठापनेच्या पहिल्या दिवशी व विसर्जनाच्या दिवशी दरबार भरविण्याची पूर्व परंपरा आहे. या दरबारामध्ये गावातील प्रतिष्ठित नागरिकांना निमंत्रित करण्याची व पान-सुपारी व श्रीफळ देण्याची प्रथा आहे. हा कार्यक्रम पार पडल्यावर उत्सवमूर्ती माई घाटावर नेली जाते. त्या ठिकाणी पुन्हा आरती करुन मिरवणुकीने ती मूर्ती आणून दरबार सभागृहात प्रतिष्ठापना केली जाते. चतुर्थीदिवशी संध्याकाळची पूजा संस्थानाधिपतींच्या हस्ते करावयाची परंपरा आहे.[८]

गणपती पंचायतन मंदिरातील उत्सव मात्र प्रतिपदेलाच सुरु होऊन पंचमीला समाप्ती होते. या उत्सवासाठी ज्या दोन उत्सव मूर्त्या वापरल्या जातात त्या कागदाच्या लगद्यापासून तयार केलेल्या असून अडीच फूट उंचीच्या आहेत. या मूर्त्या दीडशे वर्षापूर्वीच्या असून पूर्वपरंपरेने याच मूर्त्या उत्सवकाळात प्रतिष्ठापित केल्या जातात. गावातील उत्सव चतुर्थीला सुरु होतो. परंतु गणपती मंदिरातील उत्सव प्रतिपदेला सुरु होत असल्याने या गणपतींना ' चोर गणपती ' म्हणण्याची प्रथा रुढ झाली आहे.[९]

**उत्सवांतर्गत कार्यक्रम** : सन १८४४ मध्ये श्री गणपती पंचायतन मंदिराचे बांधकाम पूर्णत्वास गेल्यावर त्याचवर्षी श्री गणपती मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचा अर्चा सोहळा पार पडला होता. या सोहळ्याचा सर्व विधी शास्त्रात सांगितल्याप्रमाणे केला होता. त्यासाठी श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांनी प्रत्यक्ष याज्ञिक विधी करणारे ऋत्विज व सांगली, मिरज, कुरुंदवाड, कराड, चिंचली, म्हैसाळ, कोल्हापूर, नेर्ली, वाई, कळंबी व माहुली इत्यादी ठिकाणच्या वैदिक व शास्त्री पंडितांना निमंत्रित केले होते. तर गणपतीच्या अनुष्ठानासाठी सोळा ब्राह्मण मंडळीनाही पाचारण केले होते.[१०] या सर्व मंडळींना अलंकार, सोन्याची पवित्रके, पंचपात्री, कानातील कुड्यांचे जोड, वस्त्रे व त्यांच्या योग्यतेप्रमाणे दक्षिणा दिली होती. त्यासाठी १३,०४२ रुपये खर्च आला होता.[११] तर या सोहळ्याच्या कार्यक्रमात आपल्या कला सादर करण्यासाठी मिरज, कुरुंदवाड, कोल्हापूर व धारवाड या ठिकाणचे गवई, हरदास, कीर्तनकार, भजनीमंडळी, नायकिणी हे कलाकार आले होते. या सर्वांनाही

त्यांच्या योग्यतेप्रमाणे बिदागी दिली होती. याशिवाय भोजन तयार करणाऱ्या आचाऱ्यांचा खर्च ५२७ रु. ४ आणे आला होता.[१२]

एकंदर या अर्चा सोहळ्यासाठी जी रक्कम खर्च झाली होती. त्या रक्कमेचा तपशील असा मिळतो - भोजनासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी ३४०८ रु. २ आणे, धार्मिक विधीसाठी १७,२२५ रु. २ आणे ६ पैसे व पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी ५,९६९ रु. १ आणे ६ पैसे असा एकूण खर्च २६,६४२ रु. ६ आणे आलेला पहावयास मिळतो. याशिवाय दोन हजाराची रक्कम शिल्लक दाखविली असून ती कदाचित ऐन वेळेस खर्च करावयाची असेल असा एकंदर या अर्चा सोहळ्यासाठी ३०,००० रु. पर्यंत खर्च आलेला दिसतो.[१३]

सन १८४७ मध्ये गणपती उत्सवा दरम्यान पार पडलेल्या कार्यक्रमाच्या नोंदीचा उल्लेख श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांच्या दैनंदिनीत पहावयास मिळतो. यामध्ये आण्णा गोसावी मंगळवेढेकर, रत्नागिरीकर, करमरकर, काशिनाथ भिडे बाबा व पांडोबा गोसावी सोलापूरकर यांची कीर्तन होऊन या सर्वांना दहा रुपये प्रमाणे दक्षिणा दिली होती.[१४] त्याचबरोबर गायनासाठी इमाम नायकीण व नूरबक्ष गवई आला होता. त्यांनी उत्सवकाळात गायनाची कला सादर केल्याबद्दल इमाम नायकिणीस चाळीस रुपयाचे लुगडे व पन्नास रुपये रोख दिले होते तर नूरबक्ष गवयास पाच रुपये बिदागी दिल्याचे उल्लेख मिळतात.[१५] याशिवाय दोन हजार ब्राह्मणांना भोजन घालून दोन रुपयांपासून पाच रुपयांपर्यंत त्यांच्या योग्यतेप्रमाणे दक्षिणा दिली होती.[१६]

सन १८४८ मधील उत्सवात आण्णा बाबा मंगळवेढेकर व काशिनाथ बाबा भिडे वाईकर यांची कीर्तने झाली होती. त्यांना धोतर जोडे व दहा रुपये बिदागी दिली होती, तर नाचगाण्यासाठी रमा तेरदाळकर ही नायकीण बोलाविली होती. ती या उत्सवाच्या प्रसंगी नृत्य करीत असताना तिच्या गळ्यातील हिऱ्याची माळ हरविली होती. या संदर्भातील उल्लेख श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांच्या दैनंदिनीत पहावयास मिळतात.[१७] तसेच या उत्सवात फकिरा नायकीण तेरदाळकर, ढोल वाजविणारे साठ लोक

व रणमल्ले खेळ करणारे लोक रबकवी या गावातून आले होते. यातील फकिरा नायकीण तेरदाळकर हिस शालजोडी दिली होती तर ढोल वाजविणाऱ्या साठ लोकांना शिधा वाटप केली होती तसेच रणमल्ले खेळ करणाऱ्या रबकवी गावाच्या मल्लांना पोषाख व दुपट्टे दिले होते.[१८] या व्यतिरिक्त रोज ब्राह्मण भोजन, भजन, गायन, पंचामृत पूजा, पुराणवाचन, लळीत मंत्र जागराचे कार्यक्रम पार पाडले जात होते.[१९]

इ.स. १८६० मध्ये गणपती उत्सवाच्या दरम्यान झालेल्या खर्चाच्या ठळक नोंदी श्री गणपती पंचायतन संस्थानच्या कागदपत्रांमध्ये पहावयास मिळतात. यामध्ये ब्राह्मण भोजन, कीर्तनकार, गवये, नायकिणी, भजनकार व वाजंत्री यांची दक्षिणा तसेच सुवासिनींचे खण, तोरणासाठी केळीची पाने, दरबार भरविल्यानंतर नागरिकांना द्यावयास विड्याची कच्ची व पक्की पाने, सुपारी, श्रीफळ, अष्टगंध, उदबत्ती, गुलाबपाणी व प्रसाद या सर्वांचा खर्च ३९४ रु. ७ आणे १ पैसे झाल्याचे दिसून येते.[२०] तर १८८६ च्या उत्सव काळात चार कीर्तनकार व गायनासाठी नऊ जणांना बोलाविण्यात आले होते. त्यामध्ये मोरोबाबा गोसावी, आण्णाबाबा, गोपाळकृष्ण गोंधळी, पिराजी गोंधळी, बाळा सारंगी, परशुराम सारंगी, मारुती मृदंगी, काळू मृदंगी व महादेव बाबा गवई या लोकांचा समावेश होता. तर नृत्य करण्यासाठी तारा, अक्कू, यमुना व नैना या चार नायकिणींना निमंत्रित केले होते. उत्सव समाप्तीच्या वेळेस या नायकिणींना साडी चोळी देण्यात आली होती.[२१]

श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (दुसरे) यांच्या कारकिर्दीत प्रख्यात गायक अब्दुल करीम खाँ [२२] (१८७२-१९३६) यांनी अनेकवेळा उत्सवकाळात गायनाचे कार्यक्रम केले होते. संस्थानाच्या विलिनीकरणानंतर (१९४८) या कार्यक्रमांमध्ये कोणताही खंड न पडता धार्मिक कार्यक्रम पूर्व परंपरेने सुरु आहेत. मात्र सांस्कृतिक कार्यक्रमाला अलिकडील काळात विजयसिंराजे पटवर्धन यांनी आधुनिकतेचे वैभव प्राप्त करुन दिले आहे.[२३] सन २००७ मध्ये गणपती उत्सवादरम्यान पंचामृत पूजा, कीर्तन, प्रवचन, पुराणवाचन, गायन, हळदीकुंकू व छबिन्याचे सर्व धार्मिक कार्यक्रम पार पाडले होतेच. परंतु सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये

सुनिती राजे सांस्कृतिक कलामंच निर्मित नृत्याविष्काराचे सादरीकरण त्याचबरोबर बहुरुपी, बहुगुणी, मनोरंजनाचा इंद्रधनु हा एकपात्री प्रयोग अमोल शेवडे यांनी प्रदर्शित केला होता तर त्यागराज खाडिलकर यांचा ' ओठावरील गाणी ' हा गाण्याचा कार्यक्रम संपन्न झाला होता. या सर्व कार्यक्रमांमुळे संस्थानाचा गणेशोत्सव अपूर्व उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा होतो.[२४]

**विसर्जन मिरवणुकीचे स्वरुप :** पटवर्धन सरकारचा गणेशोत्सव खाजगी असला तरी त्याचे स्वरुप सार्वजनिकच असते. अष्टमी दिवशी निघणाऱ्या या मिरवणुकीचा सोहळा पाहण्यासाठी मिरज, पद्माळ, कुपवाड, धामणी, बुधगाव, अंकली, नांद्रे, जयसिंगपूर, इचलकरंजी, आष्टा, उगार आणि वसगडे या गावातून हजारो आबालवृध्द, महिला व तरुण सांगलीमध्ये येतात. त्यामुळे ही मिरवणूक एखाद्या गावजत्रेप्रमाणेच भासते.[२५] ५ सप्टेंबर १८४७ मध्ये सांगली संस्थान गणपती विसर्जन मिरवणुकीत २०,००० लोकसमुदाय उपस्थित असलेला उल्लेख श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांच्या दैनंदिनीत पहावयास मिळतो. दूरवरुन उपस्थित राहिलेल्या या गणेशभक्तांच्या अतूट श्रध्देचे नाते सांगलीकरांना दरवर्षी अनुभवण्यास मिळते.[२६]

संस्थान काळातील गणपतीची मिरवणूक पालखीतून निघत असे. या मिरवणुकीत अग्रभागी सजविलेल्या घोड्यांवर इशारे देणारे नगारे असायचे. त्या पाठीमागे वीस घोड्यांचे पथक असून या सर्व घोडेस्वारांचा पोषाख पारंपारिक म्हणजे सदरा व टोपी लाल रंगाची आणि विजार पांढऱ्या रंगाची अशा पध्दतीचा असावयाचा.[२७] या घोडेस्वारांच्या पाठीमागे सजविलेले उंट व चार ते पाच हत्ती असत. पालखीच्या पुढे पटवर्धन सरकार, प्रतिष्ठित नागरिक, गायक, वादक, भजनी मंडळी असत व सर्वात शेवटी उंटावर इशारे देणारे नगारे असावयाचे.[२८] त्याचबरोबर संस्थान काळात राजघराण्यासाठी जसा पोलीस बॅण्ड असे तसाच तो गणेश विसर्जन मिरवणूकीसाठी असे. विसर्जन मिरवणुकीचा प्रारंभ राजवाडा चौकातून होत असून पुढे ही मिरवणूक पटेल चौक, तानाजी चौक व गणपतीपेठ मार्ग गणपती

पंचायतन मंदिरात येत असे. या ठिकाणी देव भेटीचा कार्यक्रम व आरती होऊन टिळक चौकातून ही मिरवणूक कृष्णा नदीवर जात असे.[२९] या ठिकाणी कवठेएकंदच्या दारुकामाची आतषबाजी होत असे. त्यानंतर उत्सवमूर्ती फुलांच्या माळांनी सजविलेल्या व आकर्षक विद्युत रोषणाई केलेल्या नावेतून कृष्णा नदीच्या मध्यभागी नेऊन विसर्जित केली जात असे.[३०]

**विसर्जन मिरवणुकीचे बदलते स्वरुप :** सांगली संस्थान विलीन झाले आणि संस्थान काळातील विसर्जन मिरवणूकीच्या जुन्या स्मृती फक्त शिल्लक राहिल्या आहेत असा प्रकार श्री गणपती पंचायतन संस्थानच्या बाबतीत घडला नाही कारण या संस्थानचा कारभारच मुळी स्वतंत्र गणपती पंचायतन संस्थानमार्फत सुरु आहे.[३१] त्यामुळे एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर पूर्व परंपरेनुसार हत्ती, घोडे व उंट बाळगणाऱ्या व या लवाजम्याचा समावेश गणपती विसर्जन मिरवणुकीत करणारे श्री गणपती पंचायतन संस्थान आगळेच म्हणावे लागते.[३२] परंतु पारंपारिकतेचे जतन करीत आधुनिकतेचाही समन्वय साधण्याचे महत्वाचे कार्य गणपती पंचायतन संस्थानचे विश्वस्त श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन व व्यवस्थापक बी. के. जाजू पार पाडीत आहेत.[३३]

संस्थानच्या विलिनिकरणानंतर निघणाऱ्या विसर्जन मिरवणूकीत पारंपारिक लवाजम्यासह इतर निरनिराळ्या कार्यक्रमांचे प्रदर्शन असते. सन २००७ मध्ये निघालेल्या विसर्जन मिरवणुकीत सांगली व सांगलीवाडीच्या शाळांचे पथक, सोलापूरच्या जय महाराष्ट्र मंडळाचे शंभर जणांचे लेझीम पथक, अजमेरचे ढोलपथक व ताशा पथक, कुरुंदवाडच्या राजू आवळ्यांचे हलगी पथक, गंधर्व बॅण्ड पथक त्याबरोबरच सांगली परिसरातील भजनी पथकांचाही समावेश होता. हत्ती, घोडे व उंटाच्या ताफ्यासह पारंपारिक लवाजम्यासह निघणाऱ्या विसर्जन मिरवणूकीच्या मार्गात नागनाथ सांस्कृतिक मंडळाच्या भव्यदिव्य रांगोळ्या साकारल्या होत्या.[३४]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सन २००६ पर्यंत संस्थानकालीन उत्सवमूर्तीची विसर्जन मिरवणूक पालखीतूनच निघत असे. परंतु सन २००७ सालापासून परंपरागत गणपती विसर्जनातील पालखीचा वापर विजयसिंहराजे पटवर्धन यांनी खंडित केला. कारण या विसर्जन मिरवणुकीस भाविकांची प्रचंड गर्दी होत असल्यामुळे पालखीतील गणपतीचे दर्शन सर्व भाविकांना होत नसे. त्यामुळे भाविकांची ही अडचण दूर करण्यासाठी आणि संस्थानकालीन गणेशोत्सवास दोनशे वर्ष पूर्ण होत असल्यामुळे इतक्या वर्षापासून सुरु असलेली गणेशोत्सवाची परंपरा जपताना त्या वैभवात भर टाकण्याच्या दृष्टीने रथोत्सवाची संकल्पना प्रत्यक्षात उतरवलेली दिसून येते.[३५]

उत्सव मिरवणुकीसाठी तयार केलेला हा रथ कर्नाटकातील प्रसिध्द कारागीर वासू शेठ यांच्याकडून सागवान व बकुळीच्या लाकडापासून तयार करुन घेतला आहे. हा रथ सोळा फूट उंच असून यात ट्रकचे इंजिन जोडलेले असून त्यास स्टेअरिंगची सोय आहे. त्यामुळे ब्रेकच्या साहाय्याने पाहिजे त्या ठिकाणी हा रथ थांबविताही येतो आणि महत्वाचे म्हणजे या रथावर जनरेटरचीही सोय करण्यात आली आहे. या रथातून गणपतीच्या मूर्तीचे सर्व भाविकांना व्यवस्थित दर्शन होतेच. सन २००७ सालच्या संस्थान गणपतीच्या मिरवणुकीचे खास वैशिष्ट्य म्हणजे हा ' विजयरथ ' होय. संस्थान काळापासून पालखी ओढण्याचा मान भोई समाजाला असल्यामुळे परंपरेने रथ ओढण्याचा मानही भोई समाजालाच दिलेला आहे. त्यासाठी रथाच्या दोन्ही बाजूला दोरखंड बांधून तो ओढण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे संस्थान काळासारखेच या विसर्जन मिरवणुकीचे स्वरुप आजही लोकांना अनुभवण्यास मिळते.[३६]

**स्वातंत्र्यपूर्व काळातील सांगलीतील सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरुप :**

स्वातंत्र्यपूर्व काळात इ. स. १८९३ रोजी लोकमान्य टिळकांनी[३७] सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहुर्तमेढ रोवून या उत्सवास लोकजागृतीचे एक साधन म्हणून राष्ट्रीयत्वाचे स्वरुप प्राप्त करुन दिले. दिनांक ३ सप्टेंबर १८९५ च्या केसरी वर्तमानपत्रा मध्ये टिळकांनी म्हटंले होते की, " राष्ट्राच्या अभ्युदयासाठी असे उत्सव असणे आवश्यक आहे. कोणत्याही

लोकांमध्ये ऐकण्याची वृध्दी होण्याची जी विविध कारणे आहेत. त्यापैकी एक कारण म्हणजे उपास्य दैवत एकच असणे. वर्षातून दहा दिवस तरी एकाच देवतेचे भजन, पूजन करण्यात लोक निमग्न झाले तर त्यांच्यात ऐक्याची वृध्दी होणार नाही असे कोण म्हणेल ?''[३८] यावरुन लोकमान्य टिळकांचा या उत्सवापाठीमागचा हेतू हा दिसून येतो की, हिंदू समाज पूर्णपणे विस्कळीत झाला होता. त्यामुळे अशा समाजाला उत्सवाच्या माध्यमातून संघटित करुन स्वांतत्र्यासाठी चाललेल्या चळवळीत त्याचा सहभाग मिळवून घेणे. लोकमान्य टिळकांच्या या हेतूचा सर्वत्र पुरस्कर होऊन महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर इतर प्रांतात तसेच लहान लहान गावातील खेड्यापाड्यांपर्यंत या उत्सवाचे लोण पोहचले.[३९]

टिळकांनी राष्ट्र जागृतीसाठी सुरु केलेल्या या उत्सवाचे लोण इतर गावाप्रमाणे सांगलीतही येऊन पोहोचले याला दोन कारणे होती. एक म्हणजे सांगलीचे आराध्य दैवतच श्री गणपती होते. आणि दुसरे म्हणजे राजकीयदृष्ट्या सांगली शहर त्यावेळीही पुढारलेले होते.[४०] त्यामुळे सांगलीचा पहिला सार्वजनिक गणेशोत्सव इ. स. १९०३ रोजी न्यायशाळेतर्फे हरभट रस्त्यावरील जुन्या मुरलीधर मंदिराच्या माडीवर साजरा केला गेला. या उत्सवात वेदशास्त्रसंपन्न पांडूरंगशास्त्री अकोलेकर यांचे व्याख्यान व बुवा मराठे यांचे कीर्तन झाल्याचे उल्लेख मिळतात.[४१]

तत्पूर्वी सांगली संस्थानचे राजवैद्य आबासाहेब सांभारे [४२] (१८६५-१९३३) यांनी टिळकांच्या प्रेरणेने इ. स. १८९९ मध्ये त्यांच्या राहत्या वाड्यात गणपतीची प्रतिष्ठापना केली होती. त्यांनी उत्सवासाठी तयार केलेली वैशिष्ट्यपूर्ण मुर्ती त्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात एकमेव अशी होती. बारा फूट उंच, नऊ फुट रुंद व दीड टन वजनाची ही मूर्ती बनविण्यासाठी पांगिऱ्याचे लाकूड, कागद, खळ व पत्र्याचे पीप या साहित्याचा वापर केला होता.[४३] सन १९२० रोजी लोकमान्य टिळक ज्योतिष संमेलनाच्या निमित्ताने सांगलीत आले होते. त्यावेळेस त्यांनी ती भव्य मूर्ती पुण्यास नेण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु त्या काळात पुण्याजवळील कात्रजच्या बोगद्याची उंची कमी होती त्यामुळे एवढी उंची मूर्ती त्या ठिकाणाहून नेणे अशक्य

असल्यामुळे ती सांगलीतच राहिली.[४४] सांभारेचा हा गणेशोत्सव भाद्रपद दशमी ते अनंतचतुर्दशी असा पाच दिवसांचा होत असे. संस्थान काळामध्ये संस्थान गणपतीचा उत्सव सरकारी व सांभारे गणपतीचा उत्सव लोकांचा म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे या गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीत आजूबाजूच्या खेड्यातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असत. मिरवणुकीपुढे सनई, चौघडा, बँड व लेझीम पथके, झुलते हत्ती, उंट, घोडे, भजनी मंडळे, झुलीने सजविलेल्या बैलांच्या जोड्या व निरनिराळ्या कसरती करणारे कलाकार असत. अशी ही भव्य मिरवणुक सन १९५२ पासून दूरध्वनी व विजेच्या तारांमुळे खंडित झाली. परंतु आजही परंपरेने हा उत्सव भाद्रपद दशमी ते अनंतचतुर्दशी असाच करतात व आजही ती भव्य मूर्ती सुस्थितीत पहावयास मिळते.[४५]

या व्यतिरिक्त सांगलीमधील सार्वजनिक गणेशोत्सवाची लाट १९०५ ते १९२० पर्यंतच्या कालखंडात सांगलीच्या आसपासच्या खेड्यांपर्यंत जाऊन थडकली. हा उत्सव लोकप्रिय होऊन त्याला विराट स्वरुप प्राप्त व्हायला जनतेची स्वाभाविक उत्सवप्रियता व उत्सवाचे धार्मिक स्वरुप ही कारणे अनुकूल होतीच, परंतु त्याशिवाय आपआपल्या आवडीच्या गोष्टींचा प्रचार करण्याला हे साधन मोठे सोयीस्कर ठरले होते. त्यामुळेच गणेशोत्सव म्हणजे नवे प्रयोग, नवे उपक्रम असे समीकरणच बनले होते.[४६] या उत्सवाच्या माध्यमातून कोणी हिंदू संघटनेचा प्रचार केला तर कोणी स्वदेशीचा, कोणी मद्यपान बंदीचा उपदेश केला तर कोणी तालमीचे आखाडे काढले. कोणी मेळ्यांतून लष्करी शिस्त शिकविली तर कोणी चळवळींचा गुसपणे प्रचार केला. स्वराज्याच्या मागणीचा गुरुमंत्र मिळालेल्या व्याख्यात्यांनी तर पायाला भिंगरी बांधल्यासारखे निरनिराळ्या खेड्यापाडयातून दौरे चालू केले. एकेका दिवसात पाच-पाच वाजेपर्यंत व्याख्याने दिली जात. या व्याख्यानांमध्ये धार्मिक विषयांची चर्चा तर होतच असे. पण त्याचबरोबर स्वदेशी व बहिष्कार यांचा प्रचारही होऊ लागला.[४७]

गणेशोत्सवात व्याख्याने, कीर्तने व प्रवचने यामधून समाजजागृती होत होतीच परंतु बहुजन समाजाच्या मनाची पकड घेण्यासाठी तसेच उत्सवाची लोकप्रियता वाढविण्यासाठी

मेळा[४८] हे साधन सांगलीमध्ये प्रभावी ठरले. किंबहुना सांगली म्हणजे ' मेळ्यांचे माहेरघरच' मानले जाई. यशवंत मेळा, आझाद हिंद मेळा व समर्थ मेळा यासारखे मेळे उत्सवाच्या दोन महिने आधी आपले कार्यक्रम बसवित व उत्सवाच्या काळात ते सादर करीत. या मेळ्यांमध्ये राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक व तत्कालीन प्रश्नांवरील विषय हाताळले जात असत.[४९] प्राथमिक शाळेचे शिक्षक गुणी विद्यार्थ्यांद्वारे जे मेळे बसवत त्यामध्ये गोफ, टिपऱ्या, नाच-गाणी व निरनिराळे संवाद असत. संगीत मेळ्यातील लघुनाटके व स्फुर्तीगीतांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळ सुरु ठेवण्यास हातभार तर लावलाच. परंतु असे मेळे म्हणजे तरुणांच्या सुप्त कलागुणांचे प्रदर्शन करण्याचे एक सशक्त व्यासपीठच बनले होते.[५०]

मेळ्यांच्या पदांमुळे प्रचार-अप्रचार, वादविवाद, वर्गकलह अशा गोष्टी घडू नयेत किंवा उत्सवाचे गांभीर्य कोणत्याही तऱ्हेने नाहीसे होऊ न देता उत्सव व्यवस्थित पार पडण्यासाठी त्या त्या पेठेतील गणपतीसाठी सांगलीमध्ये स्थानिक व्यवस्थापक मंडळे अस्तित्वात आली. त्यामध्ये गणपती पेठ, कापड पेठ, सिटी हायस्कूल, समर्थ व्यायाम शाळा, सराफकट्टा, देवल क्लब, व्यापारी वाचनालय, उदय मंडळ इत्यादी मंडळे निर्माण झाली. या मंडळाच्या सभासदांना गणपतीची प्रतिष्ठापना करण्यापासून ते विसर्जन मिरवणुका सुरळीत पार पाडण्यापर्यंची सर्व जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडावी लागत असे.[५१]

विसर्जनाच्या निघणाऱ्या मिरवणुकाही वैशिष्ट्यपूर्ण अशाच असत. मिरवणुकीच्या वेळेस गणपती हे पालखीत, टांग्यात, रथात, मोटारीत अथवा बैलगाड्यांवरही ठेवलेले असत. मिरवणुकीच्या पुढे बँड, लेझीम पथके, कीर्तन, भजन व विविध कलागुणदर्शनाचे कार्यक्रम असत. त्यामुळे अशा मिरवणुका व्यवस्थितपणे पार पडीत.[५२]

**स्वातंत्र्योत्तरकालीन गणेशोत्सवाचे स्वरुप** : १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देशाला स्वातंत्र्याची प्राप्ती झाली आणि पुढील काळ जसा वेगाने बदलत गेला. त्याबरोबरच सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरुपही बदलत गेले. यामध्ये महत्वाचा बदल म्हणजे उत्सव साजरे करणाऱ्या मंडळांच्या संख्येतील भरमसाठ वाढ हा होता आणि यामध्ये सांगली शहर

ही मागे नव्हते. सन १९४७ पर्यंत सांगली शहरात प्रामुख्याने गजानन मिल, कापड पेठ, बुरुड चौक, तानाजी चौक, मित्र मंडळ, सराफ असोसिएशन, गणपती पेठ, सिटी हायस्कूल, समर्थ व्यायामशाळा, व्यापारी वाचनालय, उदय मंडळ व देवल क्लब या मंडळाची मोजकीच संख्या होती.[५३] परंतु पुढील काळात शहराचा विस्तार व लोकसंख्या जशी वाढत गेली तशीच प्रत्येक वर्षी गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळाच्या संख्येतही वाढ होत गेली. ही वाढ सन १९७० पर्यंत १०० च्या दरम्यान पोहचली तर सन १९९० मध्ये १७५ पर्यंत गेली. अलिकडील सन २००६-०७ मध्ये या मंडळांच्या संख्येचा आकडा साडेतीनशे पर्यंत पोहचला आहे.[५४]

गणेशोत्सवास सार्वजनिक सणाचे स्वरुप लाभल्यामुळे हा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्याकडे सांगलीतील सर्वच मंडळांचा कल असतो. त्यासाठी उत्सव काळात कमीत कमी ५०० व जास्तीत जास्त दोन लाखापर्यंत खर्च केला जातो. खर्चाची रक्कम वर्गणी व देणगीच्या स्वरुपात जमा केली जाते. जमा झालेल्या रक्कमेचा वापर निरनिराळ्या देखाव्यांची निर्मिती करण्यासाठी व सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी केला जातो.[५५] देखाव्यांच्या निर्मितीसाठी प्लास्टिक कार्गोटेड शीटस्, हिटलॉन स्पंज, सॅटीन कापड व मलमल या वस्तूंचा वापर केला जातोच. शिवाय थर्माकोल व प्लायवूडच्या साहाय्याने नक्षीदार खांब, निरनिराळ्या मंदिरांच्या प्रतिकृती व कमानी केल्या जातात. या व्यतिरिक्त सजावटीत हलके असणाऱ्या फायबर ग्लासच्या साहाय्याने भव्य-दिव्य हलते देखावे करण्यालाही प्राधान्य दिले जाते. देखाव्यांसाठी तयार ध्वनिफितींची मागणी बरीच वाढली असून ध्वनिफितींच्या माध्यमातून पौराणिक, ऐतिहासिक व समाज प्रबोधनपर देखावे तयार करुन घेतले जातात. त्यामुळे संवाद लेखक, निवेदक, गायक आणि वादक या कलाकारांना महत्त्व प्राप्त झाले आहे.[५६]

**प्रमुख मंडळांच्या देखाव्यांचे स्वरुप :**

**१) पौराणिक :** या प्रकारच्या देखाव्यांचे सादरीकरण करणाऱ्या मंडळांमध्ये रणझुंझार गणेशोत्सव मंडळ, कापड पेठ मंडळ, व्यापारी गणेशोत्सव मंडळ, अंहिसा क्लब गणेशोत्सव मंडळ, लक्ष्मीनारायण गणेशोत्सव मंडळ, सुवर्ण गणेशोत्सव मंडळ, सिंधी गणेशोत्सव मंडळ,

झांशी चौक गणेशोत्सव मंडळ, ओम कला क्रीडा गणेशोत्सव मंडळ आणि वसंतदादा मार्केटयार्ड गणेशोत्सव मंडळाचा समावेश आहे.[५७]

**२) ऐतिहासिक :** अशा प्रकारच्या देखाव्यांचे स्वरुप जास्त प्रमाणात शिवकालीन घटनांवर आधारित असते. या पध्दतीच्या देखाव्यांमध्ये हिराबाग गणेशोत्सव मंडळ, सुंदर गजराज युवक क्रीडा मंडळ, नवप्रभात गणेशोत्सव मंडळ, ऑल फ्रेन्डस गणेशोत्सव मंडळ, सर्वोदय गणेशोत्सव मंडळ या सर्व मंडळांचा समावेश असतो.[५८]

**३) सामाजिक :** साधारणतः या देखाव्यांची रचना समाजजागृती घडून यावी या दृष्टिकोनातून केलेली असते. या प्रकारचे देखावे मंगलमूर्ती गणेशोत्सव मंडळ, मंदिर चौक गणेशोत्सव मंडळ, पद्मा क्लब गणेशोत्सव मंडळ, शिलंगण चौक गणेशोत्सव मंडळ, वखारभाग गणेशोत्सव मंडळ, दैवज्ञ हितवर्धक गणेशोत्सव मंडळ व राजवाडा चौक गणेशोत्सव मंडळ ही सर्व मंडळे सामाजिक देखावे बसविण्यावर जास्त भर देतात.[५९]

**४) पौराणिक :** या प्रकारच्या देखाव्यांमध्ये पौराणिक, ऐतिहासिक व काल्पनिक विषय असतात. परंतु जास्तीत जास्त भर हा ऐतिहासिक प्रतिकृती उभारण्यावर असतो. या प्रतिकृतींमध्ये ऐतिहासिक मंदिरे, किल्ले, गड, राजवाडे या प्रकारांचा समावेश असतो. त्याचबरोबर प्रेक्षणीय स्थळे व काल्पनिक प्रतिकृतीही उभारल्या जातात. या प्रकारचे देखावे उभारण्यासाठी थर्माकोल व प्लायवूडचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. या प्रकारचे देखावे श्री गजानन मंडळ, अष्टविनायक गणेशोत्सव मंडळ, सागर स्पोर्टस गणेशोत्सव मंडळ, कॉलेज कॉर्नर क्रीडा मंडळ, शक्तिभवानी गणेशोत्सव मंडळ, झुंजार चौक गणेशोत्सव मंडळ व दीनानाथ गणेशोत्सव मंडळांचा समावेश असतो.[६०]

**५) कलाकृती :** या स्वरुपाच्या प्रकारामध्ये निरनिराळ्या कलाकृतींचा समावेश असतो. त्यामध्ये संगीतदिव्यांचे देखावे, मंदिरे, धरणे, धबधबे किंवा काल्पनिक देखाव्याचाही समोवश असतो. अशा प्रकारचे देखावे संभाजी गणेशोत्सव मंडळ, शहिद भगतसिंग गणेशोत्सव मंडळ, मोटार मालक एजंट कामगार संघ, ऑल फ्रेन्डस् गणेशोत्सव मंडळ, आदर्श भारत सेवा

संस्था, नवभारत गणेशोत्सव मंडळ, मित्र मंडळ गणेशोत्सव मंडळ, इंद्रदीप गणेशोत्सव मंडळ, विजयंता मंडळ व सराफ असोसिएशन मंडळ या मंडळांचा समावेश असतो.[६१]

**६) सजीव :** साधारणतः अशा प्रकारच्या देखाव्यांमध्ये पौराणिक व ऐतिहासिक विषय हाताळले जातात. त्याबरोबरच सामाजिक जागृतीसाठी एड्स निर्मुलन, हुंडाबंदी, नशाबंदी व सर्वधर्म समभाव या सारखे विषय घेऊन देखाव्यांमध्ये प्रदर्शित केले जातात. अशा प्रकारचे देखावे बसविण्याचे कार्य जयजवान जयकिसान गणेशोत्सव मंडळ, खोकी मालक संघटना व बुरुड चौक गणेशोत्सव ही मंडळे करतात.[६२]

**कार्यक्रमाचे बदलते स्वरुप :** स्वातंत्र्योत्तर काळात समाजातील माणसांच्या मनाची अभिरुची जशी बदलत गेली तशीच गणेशोत्सवातील करमणुकीच्या व मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे स्वरुपही परिणामकारकरित्या बदललेले दिसते. कीर्तने, प्रवचने व व्याख्याने यांची जागा पडद्यावरील चित्रपट, नाटके, रेकॉर्ड डान्स व वाद्यवृंद यासारख्या आधुनिक कलाप्रकारांनी घेतली. मेळ्यांचा कार्यक्रम तर इतिहास जमा झालेला दिसतो.[६३]

या व्यतिरिक्त सांगलीतील काही मोजकी गणेश मंडळे मात्र खरोखरच स्पृहनीय असे समाज प्रबोधनाचे व समाज जागृतीचे उपक्रम राबवितात. यामध्ये श्री गजानन मंडळ, सावकार मंडळ, ओम गणेश मंडळ, हिराबाग कॉर्नर गणेश मंडळ, रणझुंजार व कापडपेठ गणेश मंडळ इत्यादी मंडळे धार्मिक उपक्रम राबवून समाज जागृती करतातच. परंतु समाज सुधारण्यासाठी निरनिराळे उपक्रम राबवतात. यामध्ये विधवा, निराधार व बेघर महिलांना महाराष्ट्र व केंद्र शासनामार्फत पेन्शन मंजूर करुन देणे, महिलांना घरबसल्या करता येण्यासारख्या उद्योगांचे प्रशिक्षण देणे, परिसराचा विकास, लहान मुलांच्यासाठी अभ्यासिका, व्यायामशाळा यांची सोय, आरोग्य शिबीराचे आयोजन, रक्तदान शिबीरांचे आयोजन, मोफत रुग्णवाहिकांची सोय असे अनेक उपक्रम ही मंडळे गरजू लोकांसाठी राबवत असतात. दुष्काळभागात मोफत चारा वाटप करण्याचे कार्य ही मंडळे करत असतात. सांगलीमध्ये सन २००५-०६

रोजी कृष्णा नदीला आलेल्या पुरामुळे हजारो लोकांना बेघर व्हावे लागले. अशावेळी या लोकांना मोफत आहार व जीवनावश्यक वस्तू पुरविण्याचे काम या मंडळींनी केले.[६४]

या प्रमुख मंडळांचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) कापडपेठ गणेशोत्सव मंडळ :** या मंडळाची स्थापना १९३० सालची असून संस्थापकांमध्ये बजाज, सारडा व बियाणी हे सभासद होते. सध्या या मंडळाच्या कार्यकर्त्यांची संख्या १५ पर्यंत आहे तर सभासद संख्या ५०० पर्यंत आहे. या मंडळाची सार्वजनिक संस्था नसून वर्गणीद्वारे ३५ ते ४० हजारापर्यंत रक्कम जमा होते. त्याचबरोबर जुन्या देखाव्यांची विक्री करुन १५ हजारापर्यंत रक्कम मिळते. या जमा झालेल्या रक्कमेतून देखावे व सजावटींवर खर्च केला जातो. या मंडळाचे सर्व देखावे पौराणिक विषयावर तसेच श्रीकृष्ण व विठ्ठल या देवतांच्यावर आधारित असतात.[६५] या मंडळाची उत्सवमूर्ती अडीच ते तीन फूट उंचीची असून २५ वर्षांनी ही मूर्ती विसर्जित केली जाते. दरवर्षी उत्सवकाळात मात्र एक ते दीड फूट उंचीची दुसरी मूर्ती आणली जाते. अकरा दिवसाच्या उत्सवानंतर या लहान मूर्तीचे विसर्जन केले जाते. या मंडळाची विसर्जन मिरवणूक काढली जात नाही. उत्सवकाळात दररोज प्रसादाचे वाटप केले जाते तर वर्षभर सामाजिक उपक्रमांमध्ये पूरग्रस्तांना मदत, रक्तदान शिबीर व गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले जाते.[६६]

**२) मित्रमंडळ गणेशोत्सव मंडळ :** सन १९३८ ची या मंडळाची स्थापना असून ‘ मित्रमंडळ कल्चरल असोसिएशन ’ या सार्वजनिक संस्थेची स्थापना सन १९८५ मध्ये झाली आहे. या मंडळाच्या संस्थेस सभासद वर्गणी व जाहिरातींच्या प्रदर्शनामधून दरवर्षी तीन लाखांपर्यंत रक्कम प्राप्त होते. यातील ६० टक्के रक्कम उत्सव काळातील सजावटी व देखाव्यावर खर्च केली जाते तर ४० टक्के रक्कम वर्षभरातील सामाजिक उपक्रमांसाठी राखून ठेवली जाते.[६७] या मंडळाचा गणपती पेठभागमधील महानगरपालिकेच्या शाळा नं. १ च्या परिसरात बसविला जातो. त्यामुळे त्या शाळेच्या खर्चाची जबाबदारी या मंडळाने स्वत:कडे घेतली आहे. दरवर्षीच्या शाळेच्या विकासाबरोबरच शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना शालेय

साहित्य पुरविण्याचे महत्त्वाचे कार्य हे मंडळ पार पाडते. याशिवाय सामाजिक उपक्रमांमध्ये रक्तदान शिबीरांचे आयोजन, गरजू लोकांना मदत, पूरग्रस्तांना मदत करण्याचे काम हे मंडळ करते. सन १९९३ रोजी किल्लारी या ठिकाणी झालेल्या भूकंपाच्या वेळेस सर्वात पहिली तातडीची मदत या मंडळांकडून पोहोचली होती. याची दखल बी.बी.सी. च्या केंद्राने घेतली होती.[६८]

या मंडळाचे सर्व देखावे कलाकृती स्वरुपाचे असतात. त्यामध्ये संगीत कारंजे, प्रतिकृती व संगीताच्या तालावरील विद्युत दिव्यांचा वापर करुन काही वेळेस असे देखावे तयार केलेले असतात. या मंडळाची उत्सवमूर्ती अडीच फूट उंचीची असून ती ११ वर्षांनी विसर्जित केली जाते तर विसर्जनमूर्ती एक फूट उंचीची व शाडूच्या मातीपासून तयार केलेली असते. या मंडळाचा उत्सव ११ दिवसांचा असतो. सांगलीमध्ये ११ दिवस गणपती ठेवण्याची प्रथा या मंडळापासूनच सुरु झाली. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी विसर्जन मिरवणूक काढली जात नाही. विसर्जन करावयाची मूर्ती व निर्माल्याचे दान पर्यावरण संस्थांना केले जाते. सध्या या मंडळाच्या कार्यकर्त्यांची संख्या ३५ असून सभासदांची संख्या अडीच हजारपर्यंत आहे. या मंडळाचे सर्व उपक्रम स्तुत्य स्वरुपाचे आहेत.[६९]

**३) बुरुड चौक गणेशोत्सव मंडळ :** या मंडळाची स्थापना सन १९३९ मध्ये कुशाबा सुर्यवंशी, धुडिंराम सुर्यवंशी व सदाशिव नागे या कार्यकर्त्यांनी केली होती. सध्या या मंडळांच्या कार्यकत्र्यांची संख्या ४० आहे व सभ्मासदांची संख्या दोनशे आहे. या मंडळाची सार्वजनिक संस्था नसून दरवर्षी वर्गणीच्या माध्यमातून ४० हजारपर्यंत रक्कम जमा होते. यातील २० हजार रूपये देखावे व सजावटीवर खर्च केले जातात तर बाकीच्या २० हजार रक्कमेचा वापर उत्सवकाळात गोरगरीबांना महाप्रसाद करण्यासाठी व वर्षभरात गरजूंच्या अडीअडचणीसाठी वापरले जातात. मंडळाची पाच फूटी उभ्या स्थितीतील पेहलवान वेशातील मूर्ती आहे. या मूर्तीचे विसर्जन कालावधी २५ वर्षाचा आहे. विसर्जनासाठी दीड फूट उंचीची दुसरी मूर्ती आणली जाते. या मंडळाचा उत्सव सात दिवसांचा असून यामध्ये जिवंत देखाव्यांचे प्रदर्शन

केले जाते. या देखाव्यांचे विषय पौराणिक व ऐतिहासिक असतात. देखाव्यांचे सादरीकरण त्या परिसरातील मुले व मुली करतात. याशिवाय १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी झेंडा वंदनाचा कार्यक्रम साजरा केला जातो.[७०]

**४) संभाजी गणेशोत्सव मंडळ :** सन १९८६ मध्ये या मंडळाची स्थापना अशोक माने, महादेव कोळेकर, दिलीप मुळीक, दत्तात्रय घाटगे व शिवाजी सुर्यवंशी या कार्यकर्त्यांनी केली. सध्या मंडळाच्या सभासदांची संख्या एक हजारपर्यंत आहे तर कार्यकर्त्यांची संख्या ३५ आहे. मंडळाच्या उत्सवाचा सर्व खर्च वर्गणीतून केला जातो. वर्गणीतून जमा होणाऱ्या रक्कमेचा आकडा एक लाखापर्यंत असतो. मंडळाचा गणपती सात दिवसांचा असतो. या काळातील मंडळाचे देखावे कलाकृती स्वरुपाचे व काल्पनिकही असतात. या देखाव्यांसाठी व सजावटीसाठी ५० हजार रुपये खर्च केले जातात व बाकीची रक्कम वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांसाठी राखून ठेवली जाते. यामध्ये सामाजिक उपक्रमांवर भर दिला जातो. या परिसरातील संजय गांधी झोपडपट्टीचा परिसर अत्यंत मागासलेल्या अवस्थेत आहे. या परिसराच्या विकासासाठी या मंडळामार्फत कार्यकर्ते सदैव तत्पर असतात. याशिवाय रक्तदान शिबीर, मोफत नेत्रचिकित्सा, एड्स जनजागृती तसेच गरीब व गरजू लोकांना मदत करणे, पूरग्रस्त लोकांना मोफत आहार पुरविण्याचे मौलिक कार्य हे मंडळ पार पाडते.[७१]

**५) श्री गजानन मंडळ :** स्वातंत्र्यपूर्व काळात सहकार महर्षी पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील यांच्या प्रेरणेने सांगलीतील मध्यवर्ती ठिकाणी स्टेशन चौकात सन १९४५ मध्ये या मंडळाची स्थापना झाली. मंडळाचे संस्थापक कार्यकर्त्यामध्ये व्यासराव आचार्य, बाबूराव शिंदे, पोपटराव येडेकर, शंकरराव चोपडे, भिमराव जाधव, दत्तोबा माने, बाबा करमरकर, नागनाथ काकडे, उस्मान फकीर व तुकाराम केसरे या सभासदांचा समावेश होता. या सभासदांनी स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ पुढे नेण्याच्या दृष्टीने मंडळाची स्थापना केली होती. गणेशोत्सव साजरा करीत असताना पोवाडे, किर्तने, भारुडे, कलापथके याचबरोबर सामाजिक, ऐतिहासिक व पौराणिक देखाव्यांच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य करण्याचे महत्वाचे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कार्य हे मंडळ पार पाडीत होते. भारताचे माजी पंतप्रधान मोरारजीभाई देसाई, इंदिरा गांधी व माजी उप पंतप्रधान यशवंतराव चव्हाण यासारख्या मान्यवर व्यक्तींनी या मंडळास भेट देऊन मंडळाची प्रशंसा केली होती.

सध्या या मंडळाची सभासद संख्या दहा असून मंडळाची स्वत:ची खाजगी संस्था आहे. या संस्थेत देणगी व वर्गणीच्या माध्यमातून दरवर्षी एक लाखापर्यंत रक्कम जमा होतेच. शिवाय मागील वर्षी जमा झालेल्या रक्कमेचे व्याज असते. या रक्कमांमधून उत्सवाचे देखावे, सजावटी, प्रसाद तसेच गरजूंना आवश्यक वस्तू पुरविण्याचे कार्य हे मंडळ करते.[७२]

**६) ओम गणेश मंडळ :** सन १९८७ मध्ये लक्ष्मण नवलाई, प्रकाश जाधव, भिमसेन नवलाई, चंद्रकांत माने, बाळासाहेब पाटील या कार्यकर्त्यांनी ओम गणेश मंडळाची स्थापना केली. गणेशोत्सवाचे माध्यम स्विकारुन या मंडळाने अनेक समाजोपयोगी कामे केली आहेत. यामध्ये झोपडपट्टी सुधारणा, रिक्षा संघटना, खोकी संघटना, भिशी मंडळ, ओम गणेश पतसंस्था, आठवडा बाजार, परिसर विकास यासारखे अनेक उपक्रम राबविले असून ते चिरंतनकाळ टिकावे यासाठी ओम गणेश मंडळाचे रुपांतर ओम गणेश सार्वजनिक गणपती संस्थेत करण्यात आले. या मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे यांची एकवीस किलो वजनाची चांदीची मूर्ती आहे. उत्सव काळात छोट्या उत्सव मूर्तीबरोबरच या मूर्तीचीही प्रतिष्ठापना केली जाते. हा गणपती नवसाला पावतो अशी भाविकांची श्रध्दा असून गणेशोत्सवकाळात जवळ जवळ नवसाचे दहा हजार नारळ वाहिले जातात. सन २००१ रोजी या मंडळास वर्गणी व देणगी रुपाने २,१५,५९६ रुपये प्राप्त झाले होते. या रक्कमेचा वापर उत्सव काळातील खर्च भागविण्यासाठी केला जातो. या मंडळाची सभासद संख्या तीस असून मंडळाचे कार्य अभिमानास्पद असेच आहे. उत्सव काळातील मंडळांचे देखावे पौराणिक, ऐतिहासिक व प्रतिकृती स्वरुपाचे असतात. साधारणत: समाजजागृती घडून येईल अशा स्वरुपाचेच देखावे प्रदर्शित केले जातात.[७३]

**७) सावकार गणेशोत्सव मंडळ :** सन १९८७ मधील मंडळाचा स्थापना काल असून सभासद संख्या तेवीसपर्यंत आहे. या मंडळाची सार्वजनिक संस्था असून या संस्थेमार्फत मंडळाचे कार्य सुरु असते. दरवर्षी उत्सवकाळात साधारणतः एक ते दीड लाखाच्या दरम्यान रक्कम जमा होते. या रक्कमेतून उत्सवकाळात सत्य घटनेवर आधारित पौराणिक, वैज्ञानिक, यांत्रिक व सामाजिक प्रबोधनावर आधारित देखावे सादर करुन समाज प्रबोधनाचे काम केले जाते. मंडळाच्या स्थापनेपासून प्रत्येक वर्षी प्रथम क्रमांकाची पारितोषिके मिळविण्याची वैभवशाली परंपरा या मंडळाने जोपासली आहेच. शिवाय मंडळाच्या माध्यमातून गोरगरीब जनतेची सेवा, गरजू रुग्णांना औषधोपचार, होतकरु विद्यार्थ्यांना सहाय्य, खेळाडू विद्यार्थ्यांना मदत तसेच अनेक स्पर्धा व सांस्कृतिक आयोजन करुन लोकजागृतीची कामे केली आहेत.[७४]

**उत्सवकाळातील सांगली शहराचे स्वरुप :** गणेशोत्सव काळात सांगली शहराला गावजत्रेचे स्वरुप प्राप्त होते. उत्सवाच्या आधी आठ दिवस बाजारामध्ये निरनिराळ्या वस्तूंची रेलचेल पहावयास मिळते. सन २००७ मध्ये गणेशोत्सवादरम्यान बाजारात एकत्रित पूजेच्या साहित्याचा दर पंचवीस रुपये होता तर साधी रांगोळी पाच रुपये व संस्कार भारतीची रांगोळी चाळीस रुपये किलो होती. शिवाय प्रसादासाठीच्या मोदक, कलाकंद, बर्फी, पंचखाद्य, सुका मेवा यांच्या किंमती दीडशे रुपये किलो होत्या तर काजू मोदक चाळीस रुपयास एकवीस व आंबा मोदक पस्तीस रुपयास एकवीस या दराने विकले जात होते. तसेच पूजेसाठी लागणाऱ्या फुलांचे दर मात्र घटलेले होते. कारण दिवसाला दोन ते तीन हजार फुलांची आवक सांगलीमध्ये होत होती. त्यातच मुंबई कडूनही फुलांची मागणी कमी झाली होती. त्यामुळे उत्सव काळात गलांडा, झेंडू, कमळ व केवडा या प्रति फूलास दहा रुपये तर गुलाब शंभर रुपयास शेकडा, जास्वंदी तीस ते चाळीस रुपये शेकड्याने होते. तर निशिगंध पन्नास ते साठ रुपये शेकड्याने होते. फुलाची आवक घटल्याने फळांच्या किंमती मात्र महागल्या होत्या. त्यामध्ये मोसंबी तीस ते चाळीस रुपये डझन, सफरचंद व डाळिंब शंभर ते दीडशे रुपये डझन, चिकू सिताफळ व केळी वीस ते तीस रुपये डझन होते.[७५]

या व्यतिरिक्त सजावटीसाठी लागणारी थर्माकोलच्या मंदिरांच्या किंमती दहा रुपयांपासून दीडशे रुपयांपर्यंत, आसन दहा ते पन्नास रुपये, उपरणे पाच ते ऐंशी रुपये, किरीट दहा ते तीस रुपये, फेटे पाच ते चाळीस रुपये, छत्र पंधरा रुपये, सॅटिन हार तीस ते पन्नास रुपये, मोत्यांचे व फुलांचे हार पंधरा ते तीस रुपये, झुंबर पंचवीस ते शंभर रुपये, मेटल बॉल पाच ते पंधरा रुपये, मेटल पडदे चाळीस रुपये, मेटल चेन पन्नास रुपये अशा किंमती होत्या.[७६]

उत्सवकाळात पहिल्याच दिवशी पचंवीस लाख फळे, एक लाख जानवीं जोड व पंधरा लाख विड्याची पाने लागतात. उत्सवकाळात मूर्त्या तयार करण्यासाठी लागणारी शाडूची माती व उत्सवकाळात रोज लागणारा अडीचशे टन मावा गुजरातमधून येतो. प्लॅस्टर राजस्थानमधील पालोजीनगरमधून तर मंडपाला लागणाऱ्या ताडपत्र्या कोलकत्यामधून, बांबू व गणेश मूर्त्या पेण, कोल्हापूर व पुण्यातून येतात. आराशीत लागणाऱ्या लाकडी फ्रेम आसाममधून येतात. यामुळे खऱ्या अर्थाने गणेशोत्सव हा राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा होताना दिसतो.[७७]

दहा दिवसाच्या उत्सवकाळात गावामध्ये ठिकठिकाणी लहान मुलांसाठी झोपाळे, फिरती चक्रे तसेच वेगवेगळी खेळणी, फुगे, पिपाण्या, तुताऱ्या, टोप्या अशा अनेक वस्त दिसून येतात. परंतु त्याबरोबरच खाद्यपदार्थांच्या दुकानाची व चिरमुरे, बत्तासे या प्रसादाच्या दुकानाचीही रेलचेल असते.[७८]

याशिवाय वाहतूक नियंत्रण कक्षेमार्फत वाहतूकीचीही व्यवस्था चोख ठेवली जाते. भाविकांना प्रत्येक चौकातील देखावे पाहत असताना वाहतूकीचा अडथळा जाणवू नये यासाठी शाळा क्रमांक एक ते कापडपेठेपर्यंत व सिटी हायस्कूल रस्ता ते गारमेंट चौक या मार्गाने वाहने नेण्यास अकरा दिवस संपूर्णतः मनाई असते. सायंकाळी सहा वाजता देखावे खुले झाल्यावर सांगली हायस्कूल ते गणपती मंदिर व वखार भाग परिसरात वाहने नेण्यास बंदी असते. वाहने लावण्याची व्यवस्था जामवाडीतील पटेल चौक मंडळ, क्रीडांगण, जनावरांच्या बाजाराचा परिसर, शिवाजी व आंबेडकर क्रीडांगणात केली जाते.[७९]

उत्सवकाळात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलीस मुख्यालयामार्फत सहा उपअधीक्षक, पंधरा निरीक्षक, सत्तर उपनिरीक्षक, नव्वद पोलीस, तीनशे गृहरक्षक दलाचे जवान, दोन राखीव राज्य दलाच्या तुकड्या, पाच विशेष पथके, तीन स्ट्रायकिंग फोर्स पथके आणि साध्या गणवेशातील पथकांचा समावेश केला जातो.[८०]

सार्वजनिक गणपतीच्या या उत्सवात जात, गोत व पक्ष अशाप्रकारचा कोणताही भेद नसतो. त्यामुळे सांगली शहरात बसविले जाणारे काही गणपती तालमीचे, काही मंडळाचे तर काही युनियन्सचे तर काही क्लबचेही असतात. यात कोणताही स्पृश्यास्पृश भेद न करता सर्वजण समानतेने या उत्सवात सहभागी होतात. त्यामुळे या उत्सवा दरम्यान कोणत्याही गटांमध्ये भांडणे, कटकटी न होता दहा दिवसाचा हा उत्सव पूर्ण आनंदात व निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी सांगलीतील जनतेचे काही पुढारी, सरकारी अधिकारी व गणेश मंडळाचे सभासद खबरदारी घेऊन योग्य ती नियंत्रणे घालून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे गणपती विसर्जन कालावधीत सांगलीमध्ये किरकोळ गुन्ह्याऐवजी फार मोठे गुन्हे झाल्याच्या नोंदी दिसून येत नाहीत.[८१]

स्वातंत्र्योत्तर काळ जसा वेगाने बदलत गेला. तसेच सांगलीचा गणेशोत्सव हा सार्वजनिक स्वरुपाचा एक सण किंवा उपक्रम म्हणून स्थिरावलेला दिसून येतो. दहा दिवसाच्या उत्सवकाळात सर्व जातिधर्माचे लोक एकत्रित येऊन उत्सवाचा आनंद मनमुराद लुटतात. परंतु या उत्सवकाळात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रदुषण होऊन पर्यावरणाची जी हानी होते ती रोखणे तितकेच महत्वाचे आहे. उत्सवकाळात होणाऱ्या प्रदूषणाचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**गणेशोत्सव काळात निर्माण होणारी प्रदुषणे :**

**१) ध्वनी प्रदुषण :** सांगली शहरामध्ये गणेशोत्सव काळात उत्साही स्वरुपाचे वातावरण असल्याने सर्व गणपती मंडळांपुढे कमी-अधिक प्रमाणात ध्वनिवर्धकांचा वापर केला जातो. परंतु या मंडळांना ध्वनिवर्धकांचा वापर विश्रामबाग पोलीस मुख्यालयातून लेखी

परवानगी मिळाल्याशिवाय करता येत नाही. कायद्याने सकाळी सहा ते रात्री दहा पर्यंतची वेळ ध्वनिवर्धक वापरासाठी ठरवून दिली आहे. या वेळचे उल्लंघन केल्यास ध्वनिवर्धके जप्त केली जातात. परंतु सर्व मंडळांकडून वेळेची बंधने पाळली जात असल्याने सहसा ध्वनिवर्धके जप्त होण्याचे प्रसंग घडून येत नाहीत.

गणपतीच्या विसर्जन मिरवणुका काढण्यापूर्वीही मंडळांना पोलीस मुख्यालयास लेखी अर्ज द्यावे लागतात. या अर्जामध्ये विसर्जनाचा दिनांक, मिरवणुकीची वेळ, मिरवणुकीचा मार्ग, मिरवणुकीत वापरले जाणारे ध्वनिवर्धक कोणते असून किती वॅटचे आहे. या सर्व बाबींचा संदर्भ द्यावा लागतो.[८२] सांगलीमध्ये अलिकडील चार ते पाच वर्षात मिरवणुकींमध्ये पारंपारिक वाद्यांऐवजी डिजे व डॉल्बीसारखी ध्वनिवर्धके मिरवणुकीतील तरूणाईचे आकर्षण बनले होते. परंतु या डीजे, डॉल्बीमधून बाहेर पडणारा आवाज काही हजार डेसिबलमध्ये असतो आणि मानवाला ४५ ते ५० डेसिबलपर्यंत आवाजाची तीव्रता चालू शकते. जास्तीच्या आवाजामुळे कानांचे विकार, ह्रदयरोगाची समस्या, लहान मुलांमध्ये भित्रेपणा निर्माण होणे, मानसिक आजार, तणाव, रक्तदाब वाढ तसेच ऐकण्याची क्षमता कमी होऊन प्रसंगी बहिरेपणाही येऊ शकतो. रुग्णालयाच्या परिसरातून अशा मिरवणुका जात असताना त्याचा त्रास रुग्णांनाही सहन करावा लागत असे.[८३] सन २००६-०७ रोजी पोलिसांनी रात्री १० नंतर अशा ध्वनिवर्धक साधनांवर बंदी घातल्याने मिरवणुकीसाठी अनेक मंडळांनी झांज, लेझीम, ढोल-ताशा व हलगी अशा पारंपारिक वाद्यांचा वापर केला. त्यामुळे ध्वनी प्रदुषण कमी होण्यास मदत झालीच परंतु पारंपारिक वाद्यांचीही मागणी वाढल्याने त्यांचे दरही वाढले. सन २००७ मध्ये दहा हजारात मिळणाऱ्या झांज व बॅन्ड पथकाचा दर गणेशोत्सव काळात पंधरा हजारापर्यंत पोहचला होता तर लेझीम, ढोल, ताशा व अन्य पारंपारिक वाद्यांचा दर पाच ते सात हजारापर्यंत होता. सांगलीतील गणेशोत्सव मंडळाची कागवाड, चिकोडी, बेडकीहाळ, जमखंडी, बेळगाव व कोल्हापूर या ठिकाणच्या वाद्यांना मोठ्या प्रमाणात मागणी असते.[८४]

**२) जल प्रदुषण :** गणेशोत्सव काळात महत्वाची भेडसावणारी समस्या कोणती असेल तर ती जलप्रदुषणाची होय. स्वातंत्र्यपूर्व काळात ही समस्या फारशी निर्माण होत नव्हती. त्याचे कारण म्हणजे उत्सव काळात प्रतिष्ठापित केल्या जाणाऱ्या गणपतीच्या मूर्त्या अडीच ते तीन फूट उंच व शाडूच्या मातीपासून तयार केलेल्या असत. या मूर्त्यांचे रंगही पारंपारिक व पाण्याचे असत. त्यामुळे अशा मूर्त्या विसर्जनानंतर पाण्यात चटकन विरघळत व त्यापासून जलप्रदुषण होत नसे.[८५]

परंतु अलीकडील दहा ते पंधरा वर्षात मूर्त्या मजबूत पण वजनाने हलक्या व्हाव्यात यासाठी मूर्तीकार प्लॅस्टर ऑफ पॅरिस, सळ्या व काठ्यांचा उपयोग मूर्त्या तयार करण्यासाठी करु लागले. तयार झालेल्या मूर्त्या रंगविण्यासाठी ऑईल पेंट, केरोसीन, पावडर कलर व फूमल यासारखे रंग वापरले जातात. अशा मूर्त्या दिसायला आकर्षक व उंचीने दहा ते बारा फूटापर्यंत असतात. या सुंदर दिसणाऱ्या मूर्त्या खरेदी करण्याकडे सांगलीतील सर्वच मंडळांचा कल दिसून येतो. घरगुती बसविल्या जाणाऱ्या मूर्त्याही अशाच पध्दतीने तयार केलेल्या व तीन ते चार फूट उंचीच्या असतात. मूर्त्या रेखीव, आकर्षक व वजनाने हलक्या म्हणून त्या खरेदी केल्या जातात. या मूर्त्या पाण्यात चटकन विरघळतर तर नाहीतच परंतु यामुळे पाण्यात असणाऱ्या जीव-जंतूचाही नाश होतो.[८६] सन २००४ मध्ये कृष्णा नदीच्या पाण्याची पातळी कमी असल्यामुळे त्यावर्षी विसर्जन केलेल्या मूर्त्यांचे अवशेष अक्षरश: पाण्यावर तर तरंगत होतेच. परंतु अर्धवट अवस्थेत विरघळलेल्या मूर्त्यांचा खच नदीच्या काठावर पसरला होता. हे दृश्य पहायला फारच विदारक व भयानक वाटत होते. त्यामुळे त्या मूर्त्यांचे संपूर्ण विसर्जन करण्यासाठी सांगलीतील पर्यावरण प्रेमी व्यक्ती पुढे सरसावल्या. त्यामध्ये डॉ. रविंद्र व्होरा, शिवाजीराव ओवूळकर यांच्या पुढाकाराने कोयना धरणातील पाणी कृष्णा नदीत सोडून या सर्व पर्यावरण प्रेमी कार्यकर्त्यांनी मूर्त्यांचे संपूर्ण विसर्जन घडवून आणले.[८७]

सांगलीच्या काही स्थानिक मूर्तीकारांमध्ये श्री. गवळी व श्री. रघुनाथ सत्तीकर यांनी शाडूच्या मातीपासून मूर्ती तयार करणे व पाण्यात सहज विरघळणारे कॅमलचे व पावडरचे रंग

वापरण्याचा आपला निश्चय पक्का ठेवला आहे. गावभागातील श्री. सत्तीकर यांचा परिवार जवळ जवळ अठ्ठावन्न वर्षापासून या व्यवसायात आहे. त्यांनी तयार केलेल्या या मूर्त्यांना सांगलीत बरीच मागणी असते. मूर्त्या तयार करण्यासाठी लागणारी शाडूची माती ते गुजरातमधील भावनगर येथून मागवतात. [८८]

**३) निर्माल्याची व्यवस्था :** सन २००२ पूर्वी सांगली परिसरातील भाविक गणेशोत्सव काळात व इतर दिवशीचे निर्माल्य कृष्णा नदीच्या पात्रात सोडीत असत. याशिवाय शेरीनाल्यातून मिसळणारे लाखो लीटर सांडपाणी, मर्यादित पाणीसाठ्यामुळे वाढणारे शेवाळ आणि त्यातच प्लॅस्टिक पिशव्या व निर्माल्याची भर पडत असल्यामुळे नदीच्या पाणी प्रदुषणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीरच बनत चालला होता. या समस्येतून मार्ग काढण्यासाठी डॉ. व्होरा, शिवाजीराव ओवूळकर व विजय बक्षी यासारखे पर्यावरणप्रेमी कार्यकर्ते पुढे सरसावले. या कार्यकर्त्यांनी महापालिकेच्या सहकार्याने कृष्णा नदीच्या तीरावर कायमचे निर्माल्य कुंड ठेवण्याची व्यवस्था केली. परंतु तरीही उत्सवकाळात काही नागरिकांकडून निर्माल्य व प्लॅस्टिक पिशव्या नदीपात्रात टाकल्या जातात. त्याचा सर्व ताण जलशुध्दीकरण प्रक्रियेवर पडून शहरात पाण्याची टंचाई निर्माण होते. त्यामुळे पाण्यातील निर्माल्य बाहेर काढण्यासाठी महापालिकेमार्फत कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. या कर्मचाऱ्यांना मदत करण्याचे काम डॉल्फिनसारख्या पर्यावरण संस्था करतात.[८९]

कृष्णा नदीच्या पात्रातून काढलेले निर्माल्य व कुंडातील साटप निर्माल्याची कुजणारा कचरा व प्लॅस्टिक कचरा अशी वर्गवारी केली जाते. कुजणाऱ्या निर्माल्यापासून गांडूळ खत निर्मिती प्रक्रिया सांगलीतील आमराईमध्ये पार पाडली जाते. त्यासाठी उत्सवकाळात जवळ जवळ पंधरा ट्रक कचरा आमराईत येतो. खत निर्मिती करण्यापूर्वी साधारणतः पाच दिवस हा कचरा पाणी मारुन कुजवला जातो. त्यानंतर रॅकमध्ये अथवा जाळीमध्ये प्रथम एक फूट कुजलेल्या कचऱ्याचा थर दिला जातो. त्यावर पुन्हा एक फूट पातळ शेणाचा थर दिला जातो. याप्रमाणे आलटून-पालटून एक एक थर दिले जातात. या थरामध्ये नारळाच्या केसरांचा

वापर करतात. कारण त्यामुळे गांडूळ निर्मिती मोठ्या प्रमाणावर होण्यास मदत होते. सर्वात शेवटी या थरांवर गांडूळ सोडून त्यावर गोणपाट टाकले जातात. या खतावर दोन दिवसांच्या फरकाने पाणी मारले जाते. साधारणतः खत निर्मितीस पंधरा दिवसाचा कालावधी लागतो. निर्मिती झालेल्या खताची बाहेर विक्री न करता त्याचा वापर आमराईतील वृक्षांसाठी केला जातो. प्लॅस्टिक कचरा ट्रकांद्वारे कंपोस्ट डेपोमध्ये पाठविला जातो. गणेशोत्सव काळातील ही सर्व स्वच्छता करण्यासाठी महापालिकेस २५ ते ३० हजार रुपये खर्च येतो. महापालिकेच्या व पर्यावरण प्रेमींच्या या विधायक उपक्रमामुळे कृष्णा नदीचे पाणी प्रदुषण कमी होण्यास मदत झालीच, परंतु त्याचबरोबर निर्माल्य वाया न जाता त्यापासून वृक्षवेलींना आवश्यक असणाऱ्या खताचीही निर्मिती झाली.[९०]

**४) हवा प्रदुषण :** सांगली शहरात गणेशोत्सवा दरम्यान आणखी एक भेडसावणारी समस्या म्हणजे हवेचे प्रदुषण. दहा दिवसाच्या उत्सवात अप्रत्यक्षरित्या निरनिराळ्या माध्यमतून हवेचे प्रदुषण घडून येते. यात एक म्हणजे उत्सवात मूर्त्या आणताना तसेच विसर्जनास नेत असताना फटाक्यांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. या फटाक्यांमध्ये असणाऱ्या विषारी घटकांमुळे श्वसनाचे निरनिराळे आजार निर्माण होतात. दुसरे म्हणजे दहा दिवसाच्या उत्सवात गणपतीचे देखावे व विसर्जन मिरवणुका पाहण्यासाठी स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडतातच. परंतु सांगली शहराच्या आसपासच्या खेड्यांतूनही मोठ्या संख्येने लोक सांगलीमध्ये येत असतात. त्यामुळे नेहमीपेक्षा वाहनांची गर्दी प्रचंड वाढून यातूनही हवेचे प्रदुषण होण्यास मदत होते. तिसरे म्हणजे विसर्जन मिरवणुकांमध्ये गुलाल उधळण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते. यामुळेही हवेचे प्रदुषण घडून येते. यामुळे साहजिकच निसर्गाचा समतोल बिघडतो.[९१]

वास्तविक गणेशोत्सव धार्मिक आणि सामाजिक अशा मिश्र स्वरुपाचा असल्यामुळे त्यात जशी धर्मजागृती आणि सामाजिक सुधारणांच्या कार्याला जागा आहे तसाच मनोरंजन व करमणुकीलाही वाव आहे. त्यामुळेच उत्सव काळात जे सांस्कृतिक कार्यक्रम बसविले

जातात अशा कार्यक्रमात स्थानिक व्यक्तींच्या कल्पनांना व कारागिरीला व व दिल्यास या लोकांची कला सर्वसामान्य माणसांसमोर तर पोहचेलच. परंतु कदाचित त्यामुळे त्यांचे भविष्य उज्ज्वल होण्यास मदत होईल. परंतु असे कार्यक्रम करत असताना उत्सवाचे गांभीर्य कोणत्याही तऱ्हेने नाहीसे न होऊ देण्याची खबरदारी प्रत्येक व्यक्तीने घेतली पाहिजे. बिभत्स व गलिच्छ प्रकारांवर आळा घालून सर्वांनी संघटित होऊन आपली सर्व कला स्वत:च्या व समाजाच्या प्रगतीसाठी कारणी लावली तर कार्यक्रमाचा हेतू साध्य झाल्यासारखे नक्कीच वाटेल.[९२]

सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच सर्व मंडळांच्या सदस्यांनी समाज जागृतीसाठी सक्रिय असणे गरजेचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील सांगली शहरामध्ये अज्ञान, दारिद्रय, बेकारी, व्यसनाधिनता, भ्रष्टाचार, विषमता व एड्सचा भस्मासूर यासारख्या समस्या नव्याने रुप धारण करीत आहेत. या सर्व गोष्टी विरुध्दची जागृती करण्याचे काम या तरुण कार्यकर्त्यांनी केले पाहिजे. त्यासाठी जमा झालेला निधी उत्सव काळातील रोषणाई व सजावट यावर खर्च न करता त्याचा उपयोग समाजातील उपेक्षित, दुर्लक्षित व दुर्बल घटकांच्या मदतीसाठी खर्च करण्यास प्राधान्य द्यावे. या व्यतिरिक्त राज्यात किंवा देशात आकस्मिकरित्या निर्माण झालेल्या संकटाच्या वेळी उदा. दुष्काळ, अवर्षण, पूर इत्यादी लोक वर्गणीचा ठराविक हिस्सा सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेतून पाठवून द्यावा.[९३] हे सर्व उपक्रम राबवित असताना सर्व मंडळांच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन गणपती बसविण्याची जी भरमसाठ वाढलेली संख्या आहे, यावर नियंत्रण कसे घालता येईल याचाही विचार करावयास पाहिजे. अलिकडील नऊ ते दहा वर्षात ' एक गाव एक गणपती ' किंवा ' एक वॉर्ड एक गणपती ' ही कल्पना बऱ्याचशा शहरांमध्ये रुजू झालेली दिसून येते. या संकल्पनेला सर्वप्रथम प्रतिसाद सन १९९६ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील खामसवाडी व येरमाळा या गावांनी दिला तर पुढील काळात बेळगांव जिल्ह्यातील १७५ गावांमध्ये ही योजना अंमलात आली. रायगड जिल्ह्यातील रोहा या शहरामध्ये गेली ८६ वर्षे ही संकल्पना राबविली जात आहे तर बीड जिल्ह्यात अशा गावांची संख्या सुमारे चारशेपर्यंत सांगितली जाते. विशेष

म्हणजे बीड शहरापासून सुमारे तीस कि. मी. अंतरावर असलेल्या लिंबगणेश या गावात गेल्या तीनशे वर्षापासून ही संकल्पना राबविली जात आहे. पेशवेकालीन संदर्भ असलेले लिंबगणेश हे पुरातन व धार्मिक अधिष्ठानप्राप्त गाव म्हणून ख्यातनाम आहे. या जिल्ह्याप्रमाणेच जर सांगलीतील गणेशोत्सव मंडळांची संख्या कमी झाल्यास आर्थिक टंचाईच्या काळात खर्चाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.[९४]

सांगली शहरातील गणपतींचे विसर्जन हे कृष्णा नदीवर केले जाते. या विसर्जनाच्या मिरवणुका विश्रामबाग पासूनच्या असतात. विसर्जनाच्या या मिरवणुका स्टेशन चौक, राजवाडा चौक, पटेल चौक, गणपती पेठ मार्ग येऊन गणेश मंदिरापुढून टिळक चौकातून नदीवर जातात. या मिरवणुकांमध्ये विक्षिप्त प्रकार घडू नयेत व शांततेचा भंग न होता व्यवस्थित मिरवणुका पार पाडण्याची खबरदारी मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे. कारण मिरवणुकांपुढे मद्यपान व गुलालाची उधळण करीत हिडीस नाच करणाऱ्या तरुणांचा वर्ग मोठ्या प्रमाणात असतो.[९५]

अशा पध्दतीने सर्व भेद विसरुन सर्वांना एकटा आणणारा, दैनंदिन जीवनातील सर्व दुःखे व निराशा विसरायला लावणारा, उत्साह व प्रेरणा देणारा, लोकशिक्षणाचा प्रसार करणारा असा हा गणेशोत्सव विधायक उपक्रम राबवून साजरा केला तर नक्कीच समाजजागृती होऊन भावी पिढीचे जीवन सुखकर व्हायला मदत होईल.[९६]

**निष्कर्ष :** आपल्या हिंदू धर्माचे आणि संस्कृतीचे वैशिष्ट्यच असे आहे की, आपल्याकडे अनेक उपास्य देवता आहेत. परंतु या सर्वामध्ये अगदी वैदिक काळापासून (इ.स. पूर्व २५०० वर्षापूर्वीच ते आधुनिक काळापर्यंत (१९ वे शतक) श्री गणेश देवतेचे स्थान अद्वितीय ठरले आहे. गणेशपूजेला असेतूहिमाचल असे महत्व प्राप्त झाले आहे. गणेशाच्या या उपासनेतूनच गणेशोत्सवाची निर्मिती झाली व हा उत्सव सातवाहन, राष्ट्रकूट व चालुक्य यांच्या काळापासून प्रचलित होता. याचा उल्लेख इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी इ. स. १९१० रोजी गणेशोत्सवपर केलेल्या भाषणात केलेला होता. पेशवेकाळात (१७१३-१८१८) मात्र हा उत्सव अत्यंत धामधुमीत होत असल्याच्या नोंदी मिळतात. पेशव्यांप्रमाणे त्यांचा सरदार

वर्गातही गणेशोत्सव साजरा होत असे. सांगलीचे पटवर्धन घराणे हे त्यापैकीच एक होते. पटवर्धनांचे आराध्य दैवत गणपतीच असल्यामुळे श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) (१७८३-१८५१) यांनी सांगली हे गाव राजधानीसाठी निवडून इ. स. १८०७ मध्ये गणेशदुर्ग या किल्याची उभारणी केली व सन १८१०-११ पासून या राजवाड्यातील सभागृहात गणेशोत्सवास प्रारंभ केला. पुढे इ.स. १८४४ मध्ये श्री गणपती पंचायतन मंदिराची स्थापना करुन या मंदिरातही उत्सवाला प्रारंभ केला.

स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळकांनी इ.स. १८९३ मध्ये घरातील गणपती रस्त्यावर आणून राष्ट्राच्या प्रगतीसाठी या उत्सवास सार्वजनिक स्वरुप प्राप्त करुन दिले. इतर शहराप्रमाणे या उत्सवाचे लोण सांगलीतही येऊन पोहोचले व सांगलीतील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव इ.स. १९०३ रोजी साजरा झाला. तत्पूर्वी आबासाहेब सांभारे (१८६५-१९३३) यांनी इ.स. १८९९ रोजी टिळकांच्या प्रेरणेने सांगलीमध्ये आपल्या वाड्यात जो गणेशोत्सव सुरु केला होता त्याचेही स्वरुप सार्वजनिकच होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील या उत्सवांची संख्या सांगली शहरात मर्यादितच होती व आयोजित केले जाणारे कार्यक्रम हे कीर्तन, भजन, प्रवचन, व्याख्याने व मेळे या स्वरुपाचे होते. अशा कार्यक्रमांतून समाजजागृतीचा प्रयत्न केला जायचा.

परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मात्र सांगलीमधील या उत्सवाचे स्वरुप झपाट्याने बदलले. यामध्ये उत्सवांची संख्या अमर्याद वाढलीच. परंतु पारंपारिकतेने सुरु असलेल्या कार्यक्रमांचे स्वरुपही बदलले. यामधून नको असलेल्या समस्या निर्माण होताना दिसतात. त्या व्यतिरिक्त जलप्रदुषण, ध्वनीप्रदुषण व हवेच्या प्रदुषणाचे प्रमाण वाढलेले दिसते. त्या व्यतिरिक्त सांगलीतील काही मंडळांचे कार्य मात्र नक्कीच स्फूर्तिदायक असे आहे. गणेशोत्सव हा धार्मिक व सामाजिक अशा मिश्र स्वरुपाचा असल्याने या उत्सवाचे पावित्र्य व गांभीर्य राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. या उत्सवाने सर्वांचे हित होऊन शहरातील वैषम्य नाहीसे करण्याचा प्रयत्न या तरुण पिढीने केल्यास भावी काळातील गणेशोत्सव नक्कीच सुखकर असेल.

# संदर्भ सूची व तळटीपा

१) गाडगीळ अमरेंद्र, श्री गणेशकोश, आवृत्ती - १ ली, पुणे, १९६८, पृ. २६.

२) ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, पुणे, २००१, पृ. ४७.

३) गाडगीळ अमरेंद्र, उपरोक्त, पृ. २३.

४) कित्ता, पृ. २४.

५) गाडगीळ अमरेंद्र, उपरोक्त, पृ. २७.

६) कुंठे गघाडे. ज., सांगली संस्थानाचे संस्थापक थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचे चरित्र, सांगली, १९७१, पृ. ४५.

७) सहस्त्रबुध्दे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, आवृत्ती - १ ली, कोल्हापूर, २००५, पृ. २३.

८) कित्ता, पृ. २४, २५.

९) श्री गणपती पंचायतन मंदिराचे पुजारी रमेश पाटणकर यांची मुलाखत, दि. १७ मार्च २००८.

१०) कुंठे गो. ज., उपरोक्त, पृ. २०६.

११) कित्ता, पृ. २०६.

१२) कित्ता, पृ. २०४.

१३) कित्ता, पृ. २०५.

१४) केळकर य. न., जोशी ना. के., (संपा.) श्रीमंत पहिले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन सांगली यांची दिनचर्या, खंड - १ ला, पुणे, १९६७, पृ. ७२.

१५) कित्ता, पृ. ७३.

१६) कित्ता, पृ. ७४.

१७) केळकर य. न., जोशी ना. के., (संपा.) खंड - २ रा, पृ. ११.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१८) कित्ता, पृ. १२.

१९) कित्ता, पृ. १३.

२०) श्री गणपती पंचायत संस्थान, सांगली दप्तर सन १८६० च्या रोजकिर्दमधील नोंदी, पृ. ३४.

२१) पंचायतन दप्तर, उपरोक्त, सन १८८६ च्या नोंदी, पृ. १३.

२२) अब्दुल करीम खाँ हे सुविख्यात गायक उत्तर भारतातील कुरुक्षेत्राजवळच्या किराणा घराण्यातील होते. संगीताचे शिक्षण पूर्ण झाल्यावर ते दक्षिणेत बडोदे सरकारच्या आश्रयास राहिले. तेथून ते सन १८९८ मध्ये महाराष्ट्रात आले. बेळगाव, मुंबई व पुणे अशा ठिकाणाहून शेवटी ते मिरजेस स्थायिक झाले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत सार्वजनिक जलशांद्वारा उत्तर हिंदुस्थानी व ठुमरी प्रकार लोकप्रिय कोल. ' संगीत स्वरप्रकाश ' या पुस्तकाची रचना केली. संगीत संशोधनाबद्दल त्यांना म्हैसूर दरबारातील गायक-वादकांनी १९१९-२० साली ' संगीतरत्न प्रायः ' ही बहुमानाची पदवी व रत्नजडित कंठा अर्पण केला होता. (जोशी लक्ष्मणशास्त्री., (संपा.) मराठी विश्वकोश, खंड-१ ला, मुंबई, १९७६, पृ. ३१४)

२३) दरडा राजेंद्र, (संपा.) दैनिक लोकमत, सांगली, रवि. २६ ऑगस्ट २००७, पृ. ७.

२४) ठाकूर किरण.,(संपा.) दैनिक तरुण भारत, सांगली, रवि.२६ ऑगस्ट २००७, पृ. ५.

२५) केतकर कुमार., (संपा.) दैनिक लोकसत्ता, सांगली, शुक्र १ सप्टें. २००६, पृ. १.

२६) केळकर य. न., जोशी ना. के., (संपा.) उपरोक्त, खंड - १ ला, पृ. १२.

२७) सहस्त्रबुध्दे चिंतामणी., उपरोक्त, पृ. २५.

२८) कित्ता, पृ. २६.

२९) टिळक जयवंतराव, (संपा.) दैनिक केसरी, सांगली, २ सप्टें. १९९०, पृ. २.

३०) केळकर य. न., जोशी ना. के., (संपा.) उपरोक्त, खंड - २ रा, पृ. ११.

३१) पवार प्रतापराव., (संपा.) दै. सकाळ, सांगली, २०००, पृ. ३.

३२) कित्ता, पृ. ४.

३३) ठाकूर किरण, (संपा.) दै. तरुण भारत, सांगली, रवि. २६ ऑगस्ट २००६, पृ. ४.

३४) ठाकूर किरण, (संपा.) दै. तरुण भारत, उपरोक्त, पृ. ६.

३५) श्री गणपती पंचायतन मंदिराचे व्यवस्थापक बी. के. जाजू यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती घेतली.

३६) कित्ता.

३७) लोकमान्य टिळक (१८५६-१९२०) हे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे श्रेष्ठ नेते, भगवद्गीतेचे आधुनिक भाष्यकार व प्राच्यविद्या पंडित होते. लोकजागृती करण्यासाठी टिळकांनी गणेशोत्सव (१८९४) व शिवजयंती (१८९५)हे दोन उत्सव सुरु केले. टिळकांच्या मते, भारतीय जनतेच्या जीवनात परंपरा व इतिहास यातून प्राप्त झालेले एक प्रकारचे अभिजात सामर्थ्य आहे. या सुप्त सामर्थ्याची जाणीव लोकांना करुन देऊन बदलत्या काळानुरुप नव्या माध्यमातून त्यांचा अविष्कार घडवून आणून चळवळीस योग्य दिशा प्राप्त करुन द्यावी. लोकांमधील वैयक्तिक धार्मिकतेला सामाजिक स्वरुप देऊन लोकशिक्षणाचे कार्य साधावे. दोन उत्सवांच्या निर्मिती पाठीमागचा टिळकांचा हा हेतू होता. (जोशी महादेवशास्त्री, (संपा.) भारतीय संस्कृती कोश, खंड-३ रा, पुणे, १९६५, पृ. ६२८)

३८) स्मरणिका समिती., (श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्था) सार्वजनिक गणेशोत्सव शतकाची वाटचाल, आवृत्ती - १ ली, मुंबई, १९९२, पृ. ५९.

३९) कित्ता, पृ. ६७.

४०) करंदीकर ज.स., (संपा.) श्री गणेशोत्सवाची साठ वर्षे, पुणे, १९५३, पृ. २३५.

४१) कित्ता, पृ. २३८.

४२) आबासाहेब सांभारे यांचे मूळ नाव कृष्णाजी विष्णू जोशी. तासगाव तालुक्यातील चिंचणी हे त्यांचे गाव. परंतु श्रीमंत पहिले चिंतामराव आप्पासाहेब पटवर्धन यांनी सांगली राजधानीची स्थापना केल्यावर सांगलीचा नावलौकिक वाढावा या उद्देशाने अनेक शास्त्री, पंडित, गवई, व्यापारी, वैद्य यांना सांगलीत वास्तव्यासाठी पाचारण केले. त्यामध्येही चिंचणीकर, जोशी मंडळी होती. यांना उपजिविकेसाठी सांगलीतील

श्री गणपती पंचायतन मंदिरातील चिंतामणेश्वराची म्हणजेच सांबाची पूजा करण्याची अनुमती दिली. सांबाची पूजा करणारे म्हणून त्याचे नाव ' सांभारे ' पडले व आजपर्यंत ते तसेच रुढ झाले. सांभारे हे निष्णात वैद्य होते. परंतु त्यांनी आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा कधीही दुरुपयोग केला नाही. त्यांच्याकडे उपचार करुन घेणाऱ्यांमध्ये शाहू महाराजांचे पैलवान गुलामउद्दीन, गानमहर्षि अल्लादियाखाँसाहेब, लोकमान्य टिळक, सुप्रसिध्द गायिका मोगुबाई कुर्डीकर व सुप्रसिध्द लेखक नाथमाधव यासारखे प्रतिष्ठित लोक तर होते, परंतु रोज येणाऱ्यांमध्ये सरकारी नोकरदारांपासून ते अगदी शेतकरी खेडूतापर्यंत सर्वांचा समावेश असे. (टिळक अविनाश, सांगली आणि सांगलीकर,आवृत्ती-१ ली, सांगली २००१, पृ. ६८, ६९)

४३) कित्ता, पृ. ७०.

४४) टिळक दिपक., (संपा.), दैनिक केसरी, सांगली, १४ सप्टें. १९९९, पृ. ७.

४५) शतकमहोत्सवी सांभारे गणपती कार्यक्रम पत्रिका, सप्टें १९९९, पृ. २,३.

४६) राष्ट्रप्रगती श्री गणेश उत्सव सांगली, खास पुरवणी, कोल्हापूर, ८-९-१९७०, पृ.३.

४७) कित्ता, पृ. ४.

४८) समाजातील सर्व वर्गातील व्यक्तींनी एकत्र येऊन गप्पा मारणे किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांचे एकत्रितपणे आयोजन करणे. (दाते य. रा. महाराष्ट्र शब्दकोश, विभाग-५ वा, पुणे, १९३५, पृ. २५३२)

४९) सहस्त्रबुध्दे चिंतामणी., उपरोक्त, पृ. ३१.

५०) फाटक न. र., लोकमान्य, आवृत्ती- १ ली, मुंबई, १९७२, पृ. ९४.

५१) पवार प्रतापराव., (संपा.) दै. सकाळ, सांगली, १६ सप्टेंबर, पृ. २.

५२) दरडा राजेंद्र., (संपा.) दैनिक लोकमत, सांगली, १७ सप्टें. २००४, पृ.३.

५३) श्री गजानन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची स्मरणिका, १९९४-९५, पृ. ५.

५४) धर्मादाय आयुक्त कार्यालय, सांगली येथील नोंदी.

५५) टोकेकर प्रविण (संपा.) साप्ताहिक लोकप्रभा, गणेश विशेषांक, ९ सप्टें. २००५, पृ. ३७.

५६) कित्ता, पृ. ३९.

५७) धर्मादाय आयुक्त कार्यालयातील नोंदी.

५८) कित्ता.

५९) कित्ता.

६०) कित्ता.

६१) कित्ता.

६२) कित्ता.

६३) सत्यनारायण नीला, जैन सुनिती (संपा.) लोकराज्य, मुंबई, सप्टें. २०००, पृ.८.

६४) ओम गणेश मंडळाचा वार्षिक अहवाल, सुवर्णमहोत्सवी श्री गजानन मंडळाची स्मरणिका, सावकार गणपती स्मरणिका, हिराबाग गणेश मंडळ, रणझुंझार मंडळ व कापडपेठ गणेश मंडळाची प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

६५) कापडपेठ गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष पापालाल सारडा यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

६६) कित्ता.

६७) मित्रमंडळ गणेशोत्सव मंडळाचे उपाध्यक्ष शिरीष पाटील यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

६८) कित्ता.

६९) कित्ता.

७०) बुरुड चौक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते चंदर सुर्यवंशी यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

७१) संभाजी गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अशोक माने यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

७२) श्री गजानन गणेशोत्सव मंडळाची स्मरणिका, पृ. ९.

७३) ओम गणेश मंडळाचा वार्षिक अहवाल, पृ. ३०.

७४) सावकार गणेशोत्सव मंडळाची स्मरणिका, पृ. १४.

७५) जाधव प्रतापसिंह, (संपा.) दैनिक पुढारी, १६ सप्टें. २००७, पृ. १.

७६) पवार प्रतापराव., (संपा.) दैनिक सकाळ, १६ सप्टें. २००७, पृ. २.

७७) टिळक दिपक., (संपा.) दैनिक केसरी, २६ ऑक्टो. २००७, पृ. ५.

७८) शिंगोटे मुरलीधर (संपा.) दैनिक पुण्यनगरी, १५ सप्टें. २००७, पृ. ६.

७९) वाहतूक नियंत्रण कक्ष कार्यालयाच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

८०) पोलीस मुख्यालयातील निरीक्षक अधिकारी पी. आय. खांडेकर यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

८१) टिळक जयवंतराव., (संपा.) दैनिक केसरी, २ सप्टे. १९९०, पृ. ६.

८२) विश्रामबाग पोलीस मुख्यालयातून माहिती घेतली.

८३) कित्ता.

८४) मोटार मालक एजंट कामगार संघ गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष बाळासो कलशेट्टी यांच्या भेटीतून माहिती घेतली.

८५) बाबर सरोजिनी (संपा.) श्रावण-भाद्रपद, पुणे, १९८५, पृ. ४५.

८६) जाधव प्रतापसिंह (संपा.) दैनिक पुढारी, २० सप्टें. २००७, पृ. ४.

८७) निसर्गप्रेमी डॉ. व्होरा यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

८८) मूर्तीकार गवळी व सत्तीकर यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

८९) पर्यावरणप्रेमी शिवाजीराव ओवुळकर यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

९०) आमराईचे अध्यक्ष एम्. बी. पाटील यांच्या प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळविली.

९१) ठाकूर किरण., (संपा.) दैनिक तरुण भारत, गणेश दैवत विशेषांक, अंक - २ रा, १९८६, पृ. ५३.

९२) करंदीकर ज.स., उपरोक्त, पृ. ४७.

९३) सार्वजनिक स्मरणिका समिती, उपरोक्त, पृ. ६३.

९४) ओम गणेश सार्वजनिक गणपती ट्रस्ट स्मरणिका, उपरोक्त, पृ. ३४.

९५) पवार प्रतापराव (संपा.) दैनिक सकाळ, २ सप्टें. २००६, पृ. २.

९६) श्री गजानन गणेशोत्सव मंडळ, स्मरणिका, पृ. ९.